**पुणे महानगरपालिका**
**मा.महापालिका आयुक्त तथा प्रशासक**
**पुणे महानगरपालिका**

**नगरसचिव कार्यालय**
पुणे महानगरपालिका
दिनांक -६/४ /२०२२

**पुणे महानगरपालिका – सूचना – कार्यपत्रिका क्र.१**
**एप्रिल २०२२**

पुणे महानगरपालिकेची मासिक सर्वसाधारण सभा **सोमवार,दि. ११/४/२०२२** रोजी **दुपारी ३.०० (तीन)** वाजता **महापालिका आयुक्त कार्यालयात** भरेल.

**मा.महापालिका आयुक्त तथा प्रशासक, पुणे महानगरपालिका यांचे निर्णयार्थ खालीलप्रमाणे विषय सादर करण्यात येत आहेत.**

**वृत्तांत कायम करणे.**

**प्रश्नोत्तरे**

महाराष्ट्र म.न.पा अधिनियम, १९४९ चे कलम ४४ अन्वये प्रश्नोत्तरे.

**<u>– स्थायी समितीचे ठराव –</u>**

**विषय क्र.१**

संदर्भ – १) मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र. मआ/उआ(वि)स्मार्ट सिटी/१०४० दि.२३/३/२०२१ चे पत्र.
२) मा.स्थायी समिती ठराव क्र.८२८,दि.३१/८/२०२१
३) मनपा ठराव क्र५०६, दि.२५/१०/२०२१

----

मा.महा.आयुक्त यांनी दिलेली कारणे व केलेली शिफारस विचारात घेवून –

स्मार्ट सिटी अभियानासाठी पुणे महानगरपालिकेचा हिस्सा पुणे स्मार्टसिटी डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन लिमिटेड यांना अदा करणेसाठी खालील बाबीस मान्यता द्यावी अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

१. स्मार्ट सिटी अभियानासाठी पुणे महानगरपालिकेचा र.रु.४६ कोटी ऐवजी उपलब्ध तरतुदीनुसार र. रू. ४० कोटी इतका हिस्सा पुणे स्मार्ट सिटी डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन लिमिटेड यांना अदा करणेस
२. पुणे स्मार्ट सिटी डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन लिमिटेड यांचे नावे धनादेश काढणेस
३. पुणे स्मार्ट सिटी डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन लिमिटेड यांना द्यावयाची रक्कम खालील अर्थशिर्षकातून अदा करणेस
सन २०२०-२१

अर्थशिर्षक 'FE50A104 स्मार्ट सिटी अभियान अंतर्गत सुरू होणाऱ्या प्रकल्पांसाठी (केंद्रशासन व राज्यशासन अनुदानासहित)'तरतुद र.रू. ४० कोटी

**(टिप – सदर विषयाचा विचार माहे एप्रिल २०२२ च्या कार्यपत्रिकेच्या वेळी करावा असा मनपा ठराव क्र.१०७१, दि.१०/३/२०२२ चा झाला आहे.)**

**विषय क्र.२**

संदर्भ :- १) मा.मुख्य सभा ठराव क्र.११६०,दि.१/३/२०१९
२) महा मेट्रोकडील पत्र जा.क्र.महामेट्रो/पीएमआरपी/लँड/२०२१/३३०,दि.७/८/२०२१
३) मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र. मआ/माव्य/१०४२ दि. २१/१२/२०२१ चे पत्र.
४) मा. शहर सुधारणा समिती ठराव क्र. २५८, दि. ११/२/२०२२
५) मा.स्थायी समिती ठराव क्र.२२८३ ,दि.१६/२/२०२२

----

मा.महापालिका आयुक्त यांनी त्यांच्या पत्रात दिलेली कारणे व केलेली शिफारस विचारात घेवून–

छत्रपती संभाजी उद्यान मेट्रोस्टेशन येथील भूमिगत टाकी व सर्व्हिसेस करीता मंजूर जागा क्षेत्र ४८० चौ.मी.वापरता येत नसल्याने त्याऐवजी बालगंधर्व रंगमदिरातील पार्किंगमधील १३१.१३ चौ.मी. पर्यायी जागा महामेट्रोस

हस्तांतरीत करणेसाठी खालील बाबींस मान्यता द्यावी, अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

**१.** बालगंधर्व रंगमंदिर पार्किंगलगत छत्रपती संभाजी उद्यानातील १३१.१३ चौ.मी. जागेचा ताबा प्रिमियम रक्कम रू. ९४,९३,८१२/- इतकी आकारून ३० वर्षे कालावधीकरिता पुणे मनपाच्या स्वामित्वापोटी दरवर्षी र.रू.१/- या दराने सर्व्हिसेस ( भूमिगत टाकी ) बांधणेसाठी महामेट्रोस हस्तांतरीत करणेस व करारनामा करणेस.

**२.** मा. मुख्य सभा ठराव क्र. ११६० दि. ०१/०३/२०१९ नुसार सर्व्हिसेससाठी मान्य झालेली छत्रपती संभाजी उद्यान आवारातील सुमारे ४८० चौ.मी. जागा रद्द करणे व सदर जागा पुन्हा मनपाच्या ताब्यात घेणेस.

**३.** सदर भाडेकरार हा मुदत संपुष्टात येत असताना असणाऱ्या तरतूदींना / धोरणांना अधीन राहून पुढील कालावधीकरिता नूतनीकरण पात्र राहील.

**(टिप – सदर विषयाचा विचार माहे एप्रिल २०२२ च्या कार्यपत्रिकेच्या वेळी करावा असा मनपा ठराव क्र.१११९, दि.१०/३/२०२२ चा झाला आहे.)**

**<u>विषय क्र.३</u>**

संदर्भ :- १) मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र. मआ/मलनिः/१४५५, दि. २२/२/२०२२ चे पत्र.
२) मा.स्थायी समिती ठराव क्र.२४७०,दि.११/३/२०२२

---

मा.महापालिका आयुक्त यांनी दिलेली कारणे व केलेली शिफारस विचारात घेऊन –

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ६७ (३) क मधील तरतुदींच्या अनुषंगाने पुणे शहरातील विविध तलावामधील जलपर्णी स्पायडर मशिनच्या साहाय्याने काढणे अत्यावश्यक बाब म्हणून जलपर्णी काढणेचे काम मलनिःस्सारण विभागाकडून करण्यात आलेले असून मे. मोरया डेव्हलपर्स यांनी केलल्या कामास व त्यापोटी देयक रक्कम रू. २४,५८,८४४=१३ अदा करणेसाठी खालील बाबींस मान्यता द्यावी, अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

१) महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ६७ (३) क मधील तरतुदीनुसार मे. मोरया डेव्हलपर्स यांनी केलल्या कामास पश्चात मान्यता व देय रक्कम रू. २४,५८,८४४=१३ अदा करणेस.

सन २०२१-२२ चे अंदाजपत्रक
RE21C143
पुणे शहरातील विविध तलावामधील जलपर्णी यांत्रिकी पद्धतीने Outsourcing तत्वावर काढणे.
मान्य रक्कम रू. ५०,००,०००/-

**<u>विषय क्र.४</u>**

संदर्भ :-१) मा. अति.महा.आयुक्त (इ) यांचे जा.क्र.मआ/घनकचरा /१५५९, दि. ११/३/२०२२ चे पत्र.
२) मा.स्थायी समिती ठराव क्र.२५०१,दि.११/३/२०२२

---

मा. अति. महा.आयुक्त(इ) यांनी दिलेली कारणे व केलेली शिफारस विचारात घेऊन –

पुणे महानगरपालिका सर्व क्षेत्रीय कार्यालयाकडील झाडण हद्दीतील कामे आऊट सोर्सिंगने करणेसाठी अपुरी पडणारी तरतूद र.रू. १३,३५,१२,०४५/-सोबत जोडलेल्या तक्त्यानुसार वर्गीकरणाने उपलब्ध करूनदेण्यास मान्यता द्यावी, अशी मा. मुख्य सभेकडे शिफारस आहे .

**<u>विषय क्र.५</u>**

संदर्भ :- १) मा. महेश वाबळे, मा. सौ. अर्चना पाटील, मा.सौ. उज्ज्वला जंगले, मा. प्रदीप गायकवाड, मा. राजाभाऊ लायगुडे, मा.विशाल तांबे, मा.राहुल भंडारे , मा. सौ. अश्विनी कदम, मा. श्रीमती. लता राजगुरू, मा.सौ. मानसी देशपांडे , मा. सौ. सुनिता गलांडे यांचे दि. ११/०३/२०२२ चे पत्र.
२) मा.स्थायी समिती ठराव क्र.२५३५, दि.११/३/२०२२

----

मा. स्थायी समितीची शिफारस विचारात घेऊन –

PMPML च्या सेवकांचे (चार कोटी )आरोग्य बिलासाठी ४ कोटी देण्यास मान्यता द्यावी, अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

**विषय क्र.६**

संदर्भ :- १) मा. सौ. वर्षा तापकीर, मा. विशाल तांबे, मा.सौ. मानसी देशपांडे व मा.सौ.अश्विनी कदम यांचे दि. ११/०३/२०२२ चे पत्र.

२) मा.स्थायी समिती ठराव क्र.२५३६, दि.११/३/२०२२

----

मा. स्थायी समितीची शिफारस विचारात घेऊन –

पी.एम.पी.एम.एल च्या सेवकांसाठी ७ व्या वेतन आयोगापोटी र.रू. ६ कोटी ( सहा कोटी )देण्यास मान्यता द्यावी, अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

**विषय क्र.७**

संदर्भ :- १) मा. सौ. उज्वला जंगले व मा. सौ. मनिषा कदम यांचे दि. ११/०३/२०२२ चे पत्र.

२) मा.स्थायी समिती ठराव क्र.२५३७, दि.११/३/२०२२

----

मा. स्थायी समितीची शिफारस विचारात घेऊन –

हिंदुस्थानाच्या वायव्य सीमेवर खैबर व बोलन खिंडीतून सुमारे २००० वर्षे अनेक परकीय आक्रमकांनी आपल्या देशावर वारंवार आक्रमणे करून आपल्या देशाचे लचके तोडले होते. अशा आक्रांतांपैकी एक अफगाणिस्थानाचा बादशाह अहमदशाह अब्दाली सन १७६० साली पाचव्यांदा आक्रमण करून आला. तेव्हा अशा पाशवी आक्रमणाचा बिमोड करून देशाचे संरक्षण करण्याच्या हेतूने पुण्यातील शनिवार वाडा येथून सदाशिवराव भाऊंच्या नेतृत्वात मराठा सैन्याने उत्तरेकडे कूच केले. दिनांक १४ जानेवारी १७६१ रोजी हरियाणा मधील पानिपतावर दोन्ही सैन्यांमध्ये तुंबळ युद्ध झाले. या पानिपताच्या तिसऱ्या युद्धात मराठा सैन्यांनी आपल्या पराक्रमाची पराकाष्ठा केली व धगधगत्या राष्ट्रयज्ञकुंडात आपल्या देशासाठी आपल्या प्राणांच्या सुमारे सव्वा लाख आहुत्या दिल्या. मराठा सैन्यांनी आपल्या शौर्याने परकीय आक्रमकांना जोरदार तडाखा देऊन हिंदुस्थानाच्या वायव्य सीमेवर खिंडीतून येणारी सततची आक्रमणे थांबविली. खैबर व बोलन खिंडी आपल्या रक्तामांसाच्या चिखलाने लिंपून कायमच्या बंद केल्या आणि हिंदुस्थानावर चालून येणारा आक्रमक शत्रूंच्या वाटा रोखल्या. मराठे उत्तरेत गेले ते मातृभूमीच्या सीमा निश्चित करण्यासाठी, प्राणपणाने लढले ते हिंदुस्थानाच्या भौगोलिक सीमा राखण्यासाठी आणि लढता लढता हौतात्म्य पावले ते श्रीशिवछत्रपतींनी दाखविलेल्या स्वप्नपूर्तीसाठी आणि स्वाभिमान रक्षणासाठी.

पानिपतावरील पराक्रमी योद्ध्यांना व हौतात्म्यांना मानवंदना म्हणून महाराष्ट्रातील तरूण हरियाणा मधील ''कालाआम पानिपत रणभूमी स्मारक'' येथून शौर्य ज्योत प्रज्वलित करून पानिपत ते पुणे मार्गे दिल्ली, आगरा, ग्वाल्हेर, उज्जैन, इंदूर, धार या मार्गे अखंडितपणे पायी धावत घेऊन येणार आहेत. आपल्या पूर्वजांच्या पराक्रमाला साजेसे असे शूर हुतात्म्यांचे चिरस्थायी स्मारक पुण्यामध्ये व्हावे या उद्देशाने हि शौर्य ज्योत हौतात्म्य भूमी पानिपता वरून तत्कालीन राजकीय राजधानी पुणे येथे आणली जाईल. दिल्लीतील अमर जवान ज्योती धर्तीवर चिरंतन (३६५ दिवस २४ तास) शौर्य ज्योतीच्या रूपाने 'हौतात्म्य स्मारक' शनिवार वाड्यासमोरील थोरले बाजीराव पेशवे यांची अश्वारूढ मूर्ती आणि राष्ट्रध्वज तिरंगा याच्या मधील मोकळ्या जागेमध्ये स्थापन करण्यास मान्यता द्यावी, अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

**विषय क्र.८**

संदर्भ :- १) मा.सौ.लता धायरकर यांचे दि. ११/०३/२०२२ चे पत्र.

२) मा.स्थायी समिती ठराव क्र.२५३८, दि.११/३/२०२२

----

मा. स्थायी समितीची शिफारस विचारात घेऊन –

प्रभाग क्र. २१ ब, मधील स.नं. ७७, पिंगळे वस्ती, मुंढवा येथील जागेवर (अंदाजे ०.४४९ हेक्टर) चिल्ड्रन प्ले ग्राऊंडचे आरक्षण आहे. सदर चिल्ड्रन प्ले ग्राऊंड त्वरीत विकसित करून लहान मुलांसाठी विविध प्रकारची खेळणी बसविण्यात यावीत व तदनुषंगिक कामे करण्यात यावीत. सदर कामांसाठी लागणारी तरतूद ही सन २०२१-२०२२ च्या अखर्चित रकमेतून (र.रू. ४० लाख) करण्यास मान्यता द्यावी, अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

( मा. मुख्य सभा मान्यता देईल या भरवश्यावर मा. महापालिका आयुक्त यांनी सदर ठरावाची कार्यवाही करावी.)

**विषय क्र.९**

**संदर्भ –** १) मा. महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.मआ/परि.क्र.१/१५९१, दि. १७/०३/२०२२ चे पत्र.
२) मा.स्थायी समिती ठराव क्र.२५५२, दि.२२/३/२०२२

----

नगररोड वडगावशेरी कार्यालय अंतर्गत पडीक हद्दीचे स्वच्छतेसाठी बिटसनुसार झाडणकाम करणे करिता मा. महा.आयुक्त यांचे विषयपत्रामध्ये नमूद अकुशल कंत्राटी कामगार पुरविणेचे काम ठेकेदार मे.साईराज इंडस्ट्रियल सर्विसेस प्रा.लि. यांचेकडून पुर्वगणित टेंडर रक्कमेच्या अॅटपारदराने महाराष्ट्र महापालिका अधिनियम १९४९ चे कलम ६७(३) क अन्वये करून घेणेची , त्यासाठी त्यांना वर्कऑर्डर देऊन त्यांचेशी करारनामा करून घेणेची व ठेकेदारास त्यांची प्रत्यक्ष केलेल्या कामानुसार अॅटपारदराने दिलेल्या र.रू.४,९१,२६,८५५=१८ वेतन अदाकेलेलबाबतचे व पुढील कार्यादेश होईपर्यंत वेतनापोटी येणारे बिल ठेकेदार मे.साईराज इंडस्ट्रियल सर्विसेस प्रा.लि. यांना अदा करावे लागणार असलेबाबतचे माहिती मा. महा.आयुक्त यांचे विषयपत्रामध्ये नमूदप्रमाणे महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ६७(३)(क) अन्वये केलेले कामाची माहिती मा. मुख्य सभेकडे अवलोकनार्थ सादर केल्याची नोंद घेण्यास मा. आयुक्त तथा मा. प्रशासक यांची प्रशासकीय शिफारस करण्यात येत आहे.

**विषय क्र.१०**

**संदर्भ –** **१)** सार्वजनिक आरोग्य विभाग, १० वा माळा, जी.टी. रूग्णालय आवार, नवीन मंत्रालय मुंबई – ४००००१ चे महाराष्ट्र शासन राजपत्र, असाधारण भाग– चार–ब, गुरूवार, जानेवारी १४, २०२१/ पौष शके १९४९ चे असाधारण क्रमांक – २०.
**२)** मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र. मआ/आरोग्य/९७१ दि. १६/३/२०२१ चे पत्र.
**३)** मा.स्थायी समिती ठराव क्र.२५७९,दि.२९/३/२०२२

----

पुणे महानगरपालिका कार्यक्षेत्रातील खाजगी रुग्णालये/नंर्सिग होम व्यवसायांना नोंदणी देताना वदिलेल्या नोंदणीचे विहीतमुदतीनंतर नुतणीकरण करताना सन २०२१–२०२२ या चालु आर्थिक वर्षापासुन शुल्क आकारणी करणेस खालील नमुद बाब क्र. १ ते ५ व ७ मा. मुख्य सभेच्या अवलोकनार्थ सादर करणेस तसेच बाब क्र. ६ ची अमंलबजावणी सन २०२१–२०२२ या चालु आर्थिक वर्षापासुन करणेस मान्यता द्यावी अशी मा. मुख्य सभेकडे शिफारस आहे .

१) सुधारीत दराने परवाना फी व विलंब शुल्काची आकारणी दि. ०१/४/२०२१ पासून करणेस.
२) दिलेल्या परवान्याचे नुतनीकरण परवान्याची मुदत संपुष्टात आलेल्या वर्षाच्या पुढील तीन वर्षासाठी नुतनीकरण देणेस.
३) अधिसुचनेनुसार वार्षिक परवाना शुल्क/फी आकारणी १ ते ५ खाटांसाठी रक्कम रू. ५०००/– व ५ पेक्षा जास्त खाटा असलेल्या शुश्रुषागृहाला पुढील प्रत्येकी ५ वाढीव खाटांच्या टप्प्यासाठी रक्कम रू. ५०००/– प्रति ५ खाटा प्रमाणे वाढीव शुल्क आकारणेस .
४) यापूर्वी सन २०२१ च्या पुढील कालावधीसाठी जुन्या दराने परवाना फी स्विकारून नर्सिंग होम परवाना नोंदणी व नुतनीकरण करून दिलेल्या व्यवसायधारकांकडून शासन अधिसूचनेत नमूद केलेल्या सुधारीत दराने होणारी परवाना फी ची फरक रक्कम वसूल करणेस.
५) शुश्रुषागृहाच्या दि. ०१/४/२०२१ पासून पुढील कालावधीसाठी नुतनीकरण करून दिलेल्या आस्थापनेस त्यांच्या पुढील कालावधीच्या नुतनीकरण कालावधीसाठी लगतचे मागील नुतनीकरण करून देतेवेळी आकारण्यात आलेले परवाना शुल्क+ त्यावर २५ % वाढीव शुल्कासह पुढील प्रत्येक ३ वर्षीय नुतनीकरणासाठी फक्त शुल्क/परवाना फी ची आकारणी करणेस,
६) परवाना नुतनीकरणासाठी विलंब झाल्यास संबंधित व्यवसायधारकांकडून विलंब फी खालील तक्त्यात नमूद केलेल्या सुधारीत दराने आकारणी करून वसूल करणेस

| प्रचलित पद्धत | | सुधारीत दराने आकारणी दि.०१/०४/२०२१ पासून करणेस | |
|---|---|---|---|
| बेडस संख्या | विलंब फी प्रतिमहिना | बेडस संख्या | विलंब फी प्रतिमहिना |
| १० बेडस पर्यंत | रू. ०५/– | ०५ बेडस पर्यंत | रू. ५०/– |
| १० बेडसच्या पुढे | रू. १०/– | ०६ बेडस पासून पुढे | रू. १००/– |

७) नव्याने प्रथम परवाना देतेवेळी ज्या आर्थिक वर्षात संबंधित व्यवसायधारकाचा प्रस्ताव दाखल होवून मान्यता मिळेल ते आर्थिक वर्ष धरून एकूण तीन वर्ष कालावधीसाठी परवाना देणेस.

**<u>विषय क्र.११</u>**

**संदर्भ –** १) मा. महापालिका आयुक्त यांचे जा.क्र. मआ/आरोग्य/१६२८, दि. २८/३/२०२२ चे पत्र.
२) मा.स्थायी समिती ठराव क्र.२५९९,दि.२९/३/२०२२

----

डेडिकेटेड कोविड हॉस्पिटल डॉ. दळवी रूग्णालय, शिवाजीनगर येथे बायोमेडिकल इंनिनिअर्स अनुश्री हेल्थकेअर सिस्टिम यांचे बिल महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम ६७ (३) (क) अन्वये अदा करणेसाठी खालील बाबींस पश्चात मान्यता द्यावी अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

१) अनुश्री हेल्थकेअर सिस्टिम यांना दि. २/४/२०२१ ते दि.१/९/२०२१ पर्यंत र.रू. १.६० लक्ष अधिक १८% जी.एस.टी. प्रति महा याप्रमाणे पाच महिन्याचे र.रू. ९,४४,०००/– पर्यंत केलेल्या कामास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम अन्वये केलेल्या कामाचे बिल अदा करणेस पश्चात मान्यता मिळणेस.

२) सदर कामाकरिता आरोग्य खात्याकडील अर्थशिर्षक सन २०२१–२२ ''अंतर्गत अत्यावश्यक महसूली खर्च कामासाठी खर्च '' RE17F257COVID-19'' या अर्थशिर्षकावर खर्ची टाकणेस.

३) अनुश्री हेल्थकेअर सिस्टिम यांचे बिल अदा करणेस पश्चात मान्यता द्यावी अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस असून मा. मुख्य सभेकडे अवलोकनार्थ सादर करणेस .

**<u>विषय क्र.१२</u>**

**संदर्भ –** १) मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र मआ/उआवि/१६४४, दि. ३०/३/२०२२ चे पत्र.
२) मा.स्थायी समिती ठराव क्र.२६०२,दि.३१/३/२०२२

----

स्मार्ट सिटी अभियानासाठी पुणे महानगरपालिकेचा हिस्सा पुणे स्मार्ट सिटी डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन लिमिटेड यांना अदा करणेसाठी खालील बाबींस मान्यता द्यावी मा. मुख्य सभेकडे शिफारस आहे.

१) पुणे स्मार्ट सिटी डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन लिमिटेड यांना अदा करावयाच्या रकमेसाठी सन २०२१–२२ या आर्थिक वर्षात CE17A242/SJ6-93 भारतरत्न अटलबिहारी वाजपेयी वैद्यकीय महाविद्यालय या अर्थशिर्षकावरील रक्कम रूपये २४.५० कोटी ही रक्कम FE50A104 या अर्थशिर्षकावर वर्गीकरण करणेस.

२) वर्गीकरणानंतर पुणे स्मार्ट सिटी डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन लिमिटेड यांना देय र.रू. २४.५० कोटी सन २०२१–२२ या आर्थिक वर्षात FE50A104 या अर्थशिर्षकामधून अदा करणेस.

३) सदरची रक्कम पुणे स्मार्ट सिटी डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन लिमिटेड यांना अदा करणेस.
मा.आयुक्त तथा प्रशासक यांची मान्यता देण्यात येत आहे.

**<u>विषय क्र.१३</u>**

**संदर्भ –** १) आयुक्त आयुष प्रसाद भा.प्र.से. मुख्य कार्यकारी अधिकारी पुणे जिल्हा परिषद यांचे दि. २/९/२०२१ चे पत्र.
२) मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र मआ/आरोग्य /१६४७ , दि. ३०/३/२०२२ चे पत्र.
३) मा.स्थायी समिती ठराव क्र.२६०४,दि.३१/३/२०२२

----

र.रू. ३ कोटी DISTRICT DEPUTY COMMISSIONER OF ANIMAL HUSBANDRY (STATE BANK OF INDIA) खाते क्रमांक :– १११८२९०५९८६ या खात्यामध्ये RTGS द्वारे खालीलप्रमाणे वर्ग करण्यास मान्यता द्यावी अशी मा. मुख्य सभेकडे शिफारस आहे.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|
| सन २०२१–२०२२ चे अंदाजपत्रक, आरोग्य कार्यालय, पुणे महानगरपालिका, RE17F262, कोंढवा कत्तलखाना आधुनिकीकरण करणे . | ३ कोटी | --- |
| **<u>नवीन सुचविलेले काम–</u>** आरोग्य कार्यालय, पुणे महानगरपालिका, महाराष्ट्र शासन मार्फत सुपर स्पेशालीस्ट व्हेटरनरी हॉस्पिटल औंध, पुणे या नव्याने उभारण्यात येणाऱ्या इमारतीच्या बांधकामासाठी DISTRICT DEPUTY COMMISSIONER OF ANIMAL HUSBANDRY (STATE BANK OF INDIA) खाते क्रमांक :– १११८२९०५९८६ या खात्यामध्ये RTGS द्वारे अदा करणेस. | --- | ३ कोटी |

**मा.मुख्य सभा मान्यता देईल या भरवश्यावर कार्यवाही करण्यात यावी.**

**विषय क्र.१४**

**संदर्भ –** १)मा.महापालिका आयुक्त, पुणे मनपा यांची मान्यता ठ.क्र.६/३१०,दि.१९.०७.२१.

२)शासन निर्णय महसूल व वन विभाग सीएलएस–२०२०/प्र.क्र.१२३/म–३,दि.१६.३.२०२०.

३)शासन परिपत्रक वित्त विभाग संकीर्ण–२०२०/प्र.क्र.५९/२०/कोषा.प्रशा–५, दि.१८.३.२०२०.

४) मा. महापालिका आयुक्त यांचे जा.क्र मआ/भवन/१६३०, दि.२९/३/२०२२ चे पत्र.

५) मा.स्थायी समिती ठराव क्र.५४,दि.५/४/२०२२

––––

कोरोना प्रतिबंधात्मक योजनेअंतर्गत पुणे महानगरपालिकेच्या बिबवेवाडी येथील कर्मचारी राज्य विमा महामंडळाच्या ( इ.एस.आय.सी ) रूग्णालय येथे स्थापत्यविषयककामे करणेकामी ठेकेदार मे. वर्ल्ड ऑफ स्प्रिंकलर, पुणे यांचेकडून पूर्वगणित टेंडर रकमेच्या (जी.एस.टी. सह) १ % कमीदराने महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ६७ (३) क अन्वये खालील बाबी मा.मुख्य सभेकडे अवलोकनार्थ सादर करणेस मान्यता द्यावी अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस करण्यात येतआहे.

१. कोरोना प्रतिबंधात्मक योजनेअंतर्गत पुणे महानगरपालिकेच्या बिबवेवाडी येथील कर्मचारी राज्य विमा महामंडळाच्या ( इ.एस.आय.सी ) रूग्णालय येथे मा. महा.आयुक्त यांचे विषयपत्रात नमूद स्थापत्यविषयककामे ठेकेदार मे. वर्ल्ड ऑफ स्प्रिंकलर, पुणे यांचेकडून पूर्वगणित टेंडर रकमेच्या (जी.एस.टी. सह) १ %कमीदराने महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ६७ (३) क अन्वये करून घेणेची, त्यासाठी त्यांना वर्कऑर्डर देऊन त्यांचेशी करारनामा करून घेणेची व ठेकेदारास त्यांनी प्रत्यक्ष केलेल्या कामानुसार १ %कमी दराने (जी.एस.टी. सह) नुसार येणाऱ्या एकूण र.रू. १३,३२,०१९=३५ ( अक्षरी र.रू. तेरालक्ष बत्तीसहजार एकोणीस रूपये पस्तीस फक्त ) रकमेपर्यंत बिल आदा करणेस

**विषय क्र.१५**

**संदर्भ –** १) दिनांक ११/८/२०२१ रोजीचे जाहिर प्रकटन

२) मा.प्रभाग समिती ठराव क्र.२ दि.१५/९/२०२१

३) मा.महापालिकाआयुक्त यांचे जा.क्र.मआ/परि.क्र.२/१६३२/२९.०३.२०२२.

४) मा.स्थायी समिती ठराव क्र.५६,दि.५/४/२०२२

––––

पुणे मनपा शिवाजीनगर घोलेरोड क्षेत्रिय कार्यालया अंतर्गत प्रभाग क्र. ७ मधील गोखलेनगर येथील अप्पासाहेब कुलकर्णी शाळेसमोरील मैदान येथील समाज मंदिरातील तळमजला व पहिला मजला ( क्षेत्रफळ ८४० चौ. फुट ) हि मिळकत पुणे महानगरपालिका मिळकतवाटप नियमावली २००८ मधील भाग १० (२३) नुसार सामाजिक संस्थांना समाज उपयोगी ( नॉट फॉर प्रॉफिट ) वापरा करिता ५ वर्ष चालविण्यासाठी देणेकामी , रितसर जाहीर प्रकटनाद्वारे प्राप्त झालेल्या ४ संस्थापैकी प्रभाग समिती ठरावान्वये मान्य झालेल्या''राजश्री आदिवासी पारधी समाज'' या सामाजिक संस्थेला वापराकरीता देणे बाबत व त्यांच्यासोबत करारनामा करणेस मान्यता द्यावी अशी मा. मुख्य सभेकडे शिफारस करण्यात येतआहे.

## मा.शहर सुधारणा समितीचे ठराव

**विषय क्र.१६**

**संदर्भ –** १)मा.उमेश गायकवाड व मा.सौ.वासंती जाधव यांचे दि.०९.०७.२०२१ चे पत्र.

२)शहर सुधारणा समिती ठराव क्र.६३,दि.०९.०७.२०२१

३)आरोग्य कार्यालय,पुणे महानगरपालिका जा.क्र.८६३३,दि.०४.१०.२०२१.

४) मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.मआ/शआ/१५२२, दि.०७.०३.२०२२ ने पाठविलेला अभिप्राय विचारासाठी

५) मा.शहर सुधारणा समिती ठराव क्र.२९१,दि.२९/३/२०२२

––––

फायनल प्लॉट क्र.४४१ ही मिळकत एक्सटेंशन ऑफ बरियल ग्राउंड हे आरक्षण रद्द करून सदर ठिकाणी संस्थात्मक (Institutional use)वापर अनुज्ञेय करण्यास एम.आर.टी.पी ॲाक्ट १९६६ चे कलम ३७(१) नुसार नागरिकांच्या हरकती सुचना मागवून त्यावर सुनावणी घेण्यास व तद्नंतर मा.शासनाच्या अंतिम मान्यतेस सादर करण्यास मान्यता द्यावी. अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

**विषय क्र.१७**

**संदर्भ –** १) मा.प्रधान सचिव, नगरविकास विभाग, मंत्रालय, मुंबई यांच्याकडे जा.क्र. शअजा /ज/ १८८८५, दि.०२/०३/२०२० अन्वये सादर केलेला प्रस्ताव.

२) मा.अवर सचिव, महाराष्ट्र शासन यांचे कार्यालयाकडील पत्र जा.क्र.टी.पी.एस.-१८२०/अनौसं-१७/ २०२०/ नवि-१३,दि.७/१०/२०२० प्राप्त दि.२९/१०/२०२०.

३) मा.प्रधान सचिव-१,नगरविकास विभाग,मंत्रालय,मुंबई-३२ यांचेकडे जा.क्र. शअजा / ९६५०, दि.१०/११/२०२० अन्वये पाठविलेले पत्र.

४) मे.नगर विकास विभाग,महाराष्ट्र शासन यांचेकडील शासन सूचना जा.क्र.टीपीएस-१८२०/अनौसं-१७/ प्र.क्र. ११३ /२०२०/कलम ३७(१ क क)/नवि-१३,दि.२५/११/२०२१.

५) मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र. मआ/शहर अभि./१६०२,दि.१७.०३.२०२२ चे पत्र.

६) मा.शहर सुधारणा समिती ठराव क्र.३००,दि.२९/३/२०२२

----

महाराष्ट्र प्रादेशिक नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७(१) (क)(क) नुसारची कार्यवाही मे.शासनाकडून होणेबाबत संदर्भ क्र.(१)व (३) अन्वये मे.राज्य शासनास प्रस्ताव पाठविण्यात आला होता. सदरच्या प्रस्तावास अनुसरून संदर्भ क्र.(४) अन्वये मे.राज्य शासनाने शासन सूचना प्रसिद्ध करून हरकती /सूचना पाठविण्यासाठी ३० दिवसांची मुदत दिलीआहे. त्यासपुणे महानगरपालिकेची हरकत नसल्याबाबतचे पत्र अलहिदा पाठवीत आहोत. संदर्भ क्र.४ चे अधिसूचनेमध्ये नमूद केल्याप्रमाणे आरक्षण ठेवणेस पुणे मनपाची हरकत नसल्याचे कळविण्यास मान्यता द्यावी अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

**विषय क्र.१८**

**संदर्भ –** १) मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.मआ/टिडीआर/१६०४, दि. १७/०३/२०२२ चे पत्र.

२) मा.शहर सुधारणा समिती ठराव क्र.३०२,दि.२९/३/२०२२

----

पुणे महानगरपालिकेकडून पुणे ,नाना पेठ, सि.स.नं.५६१अ, ५६१/ब/१, ५६१/ब/१ अ व ५६२ देण्यात आलेल्या माहे जानेवारी २०२२ मध्ये खालीलप्रमाणे अदा करणेत आलेल्या डी.आर.सी.ची माहिती मुख्य सभेकडे अवलोकनार्थ सादर करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

| अ. क्र. | मिळकतीचा तपशील | आरक्षणाचा प्रकार | डी.आर.सी. होल्डरचे नाव | टिडी आर झोन | क्षेत्र चौ.मी. | डी आर सी क्र. | डी आर सी दिल्याचा दिनांक |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | पुणे नाना पेठ सि.स.नं. ५६१अ,५६१/ब/१, ५६१/ब/१, व अ व ५६२ | झोपडपट्टी पुनर्वसन योजना | मे.आनंद डेव्हलपर्स | सुधारीत नियमावली दि.१५(१) -५ नुसार झोन नाहीत | ६८२९.०७ चौ.मी | ००४६३५ | जानेवारी २०२२ |

**मा.नांव समितीचा ठराव**

**विषय क्र.१९**

**संदर्भः- मुख्य सभा ठराव क्र. ४, दि.२०/०४/२०१७**

**विषयः-** पुणे मनपाच्या हददीतील उद्याने, रस्ते, पुल, चौक इतर सार्वजनिक ठिकाणांना योग्य त्या नावाची शिफारस करणे.

नाव समितीची सभा गुरूवार दि.१०/०३/२०२२ रोजी दुपारी ३.३० (तीन वाजून तीस मिनिटे) विशेष समिती सभागृह, दुसरा मजला पुणे महानगरपालिकेची नविन विस्तारित इमारत येथे दृकश्राव्य (व्हिडीओ कॉन्फरन्सींग) द्वारे भरली होती. त्यामध्ये खालील विषय मान्य करण्यात आलेले असून त्यास मान्यता द्यावी, अशी मा. मुख्य सभेकडे शिफारस आहे.

| वि.क्र. | सुचकाचे नाव | संक्षिप्त सिमा विस्तार | सुचविलेले नाव | मा.महा.आयुक्त यांचा अभिप्राय |
|---|---|---|---|---|
| ५२५ | मा.गणेश ढोरे<br>मा.अश्विनीताई पोकळे | प्रभाग क्र.४२अ,भेकराईनगर, गंगानगर, बनकर शाळेजवळील विरंगुळा केंद्रास | शहिद सौरभ फराटे विरंगुळा केंद्र | मान्य |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ५३० | मा. श्री. युवराज बेलदरे<br>मा. श्री. वसंत मोरे<br>मा. श्रीमती अमृताताई बाबर<br>मा. सौ. स्मिताताई कोंढरे | प्रभाग क्र.४० मधील फ्लेनगर स.नं. ३४ येथील ओटा मार्केट इमारतीस | " स्व.श्री. संभाजी नाना बेलदरे (मा. सरपंच) बहुउददेशीय भवन" | मान्य |
| ५३१ | मा. श्रीमती रंजना टिळेकर<br>मा. सौ. वृषाली कामठे<br>मा. श्री. विरसेन जगताप | प्रभाग क्र. ४१मध्ये कोंढवा बु.स.नं. २९/२४/२५/१८ येथील ॲमेनिटी स्पेस वरती विकसित करण्यात आलेल्या प्लेस मेकींग या परिसरास | " कै. राजेंद्र मारूती मरळ" | मान्य |
| ५३२ | मा. श्रीमती रंजना टिळेकर<br>मा. सौ. वृषाली कामठे<br>मा. श्री. विरसिंग जगताप | प्रभाग क्र. ४१ मध्ये कोंढवा बु. स.नं. २४ व २५ या परिसरास | " ह. भ.प. कै. बेबीताई रघुनाथ मरळ" | मान्य |
| ५३३ | मा. श्री. प्रकाश ढोरे<br>मा.सौ.अर्चना मुसळे | प्रभाग क्र. ८ ड बोपोडीमधील नवीन ई– लर्निंग शाळेस | " स्व. सुमनताई ज्ञानोबा ढोरे ई– लर्निंग स्कुल" | मान्य |
| ५३४ | मा. सौ. राजश्री नवले<br>मा. श्री. हरिदास चरवड<br>मा. श्री. राजाभाऊ लायगुडे | प्रभाग क्र.३३ मधील प्रयेजा सिटी ते नांदेड सिटी येथील स.नं. ७१ वडगांव बुद्रुक ते स.नं. ३९ वडगाव खुर्द येथील डी.पी. रस्त्यास | " कै. उमाकांत पांडुरंग कुंभारकर पाटील मार्ग" | मान्य सदरचे नाव मान्य |
| ५३५ | मा. श्री. धनराज घोगरे<br>मा. सौ. कालिंदा पुंडे<br>मा. रघुनाथ गौडा | प्रभाग क्र. २५ श्रीमंत महादजी शिंदे मनपा प्राथमिक शाळा क्र. ६२ बी येथे नव्याने तयार होणाऱ्या बास्केट बॉल कोर्ट व पॅवेलियनला | "श्रीमंत महादजी शिंदे बास्केटबॉल कोर्ट व पॅवेलियन" | मान्य |
| ५३६ | मा. सौ. अश्विनी पोकळे<br>मा. श्री. गणेश ढोरे | प्रभाग क्र. ४२ ब धायरी स.नं. ११/४/५ राज ब्लीस व युवानील सोसा.कडे जाणाऱ्या रस्त्यास | " कै. यमुनाताई पोकळे नगर" | मान्य |
| ५३७ | मा. सौ. अश्विनी पोकळे<br>मा. श्री. गणेश ढोरे | प्रभाग क्र. ४२ ब धायरी रायकर मळयाकडे जाणाऱ्या पुलास | " शिवभक्त श्री जैतुजीबाबा रायकर" | मान्य |
| ५३८ | मा.सौ.नंदा लोणकर<br>मा.श्री.संजय घुले<br>मा.श्री.प्रमोद भानगिरे | प्रभाग क्र.२६ क मधील ज्योती हॉटेल चौक ते एन.आय.बी.एम.चौक पर्यंतच्या रस्त्यास | पेरिनशेरी माझदा रस्ता | नांव देणे अडचणीचेआहे अशा अशयाचा मा. मुख्य अभियंता वाहतुक नियोजन विभाग यांचा अभिप्राय मान्य |
| ५३९ | मा.सौ.हेमलता मगर<br>मा.चेतन तुपे पाटील<br>मा.सुनिल उर्फ बंडुतात्या गायकवाड | प्रभाग.क्र.२२ ब मगरपट्टा येथील मगरपट्टासिटी पोलिस चौकी समोरील मगरपट्टासिटी कडे जाणाऱ्या रस्त्यास | कै.निवृत्ती शंकर मगर पथ | मान्य |

**<u>मा.सभासदांचा प्रस्ताव</u>**

**<u>विषय क्र.२०</u>**

संदर्भ :- मा. धनराज घोगरे व मा.राजेश येनपुरे यांची सूचना दि.२८/२/२०२०

१) मा.शिवाजी केदारी व मा.सुधीर जानजोत यांचे दि.१४.१२.९३ चे पत्र

२) मा.शिवाजी केदारी व मा.अभय छाजेड यांचे दि.१४.६.९४ चे पत्र.

३) मा.सौ.भावना केदारी व मा.रामदास पवार यांचे दि.१७.६.९७ चे पत्र.

४) शहर सुधारणा समिती ठ.क्र.(१)११४०,दि.१६.१२.९३(२)१३१,दि.२३.६.९४ (३) ९३,दि.१९.६.९७

५) मा.अति.महा.आयुक्त (वि) यांनी पत्र क्र.मआ–नअ–वियो–२४८,दि.२५.५.२०००ने पाठविलेला अभिप्राय

६) शहर सुधारणा समिती ठराव क्र.२२२,दि.१४.७.२०००

----

१) वानवडी स.नं.६२, हि.नं.७,८ मधून २० फुटांचा रस्ता आखण्याचा ठराव आहे. जागेवर हिश्श्यांचे मध्य भागातील ३० फुट रस्त्याचे पूर्वेस श्री.बिलाल मिस्त्री यांची जागा आहे. मिस्त्री यांचे जागेत पूर्वेकडे गुंठेवारी पध्दतीची बांधकामे झालेली आहे. तेथील रहिवासियांनी वर नमूद केल्याप्रमाणे १० ते १२ फुटाची जागा सामाईक रस्त्यासाठी मोकळी जोडलेली आहे. या रिहवासियांना रस्ता मिळणे आवश्यक आहे. मूळ ठरावात नमूद केल्याप्रमाणे हिश्याचे मध्यभागातून रस्ता आखावयाचा झाल्यास श्री.मिस्त्री यांनी प्रथमच पासूनच अशा रस्त्याच्या आखणीस विरोध केल्यास्तव मिस्त्री यांनी सुचविल्याप्रमाणे त्यांचे जागेच्या दक्षिणेकडील १० फुट जागा रस्त्यासाठी त्यांनी मोकळी सोडली आहे. त्यांचे जागेतून दक्षिण उत्तर असा ( चॅम्पर) हा आखावा लागणार आहे. श्री.मिस्त्री यांचे पूर्वेकडील जागेतील गुंठेवारी पध्दतीची बांधकामातील सुटलेल्या जागेचाही सामाईक रस्त्याची रूंदी ही.डी.सी.रूल नियम क्र.१२.३ नुसार मिळत नसल्याने त्या भागात रस्ता आखणे संयुक्तिक होणार नाही. यास्तव सोबतच्या नकाशात दर्शविल्याप्रमाणे अ, ब.ब–१ आद्याक्षराप्रमाणे दर्शविल्यानुसार २० फुट रूंदीचा रस्ता आखणे योग्य होईल.

२) वानवडी स.नं.६२,हि.नं.६ मध्येही गुंठेवारी पध्दतीची बांधकाम असून तेथेही सामाईक रस्त्यासाठी सुटलेली जागाही १० ते १२ फुट इतकीच आहे. डी.सी.रूल क्र.नियम क्र.१२ नुसार सामाईक रस्त्यासाठी सुटलेली जागा ही रूंदीपात्र ठरत नसल्याने याही हिश्यात पुरेशी रूंदी अभावी रस्त्याची आखणी करणे संयुक्त होणार नाही.

३) वानवडी स.नं.६२, हि.नं.१ ते १२ मध्येही दक्षिण–उत्तर अशीच गुंठेवारी पध्दतीची बांधकामे असून तिथेही १० ते १२ फुट सामाईक रस्त्यासाठी जागा सुटलेली आहे. डी.सी.रूल नियम क्र.१२.३ नुसार रस्त्याच्या रूंदी मिळत नसल्याने रस्ता आखणे संयुक्तिक होणार नाही.

तरी वानवडी स.नं.६२, हि.नं.७–८ मधून मा.महा.आयुक्त यांच्या पत्रासोबतच्या नकाशात अ–ब–ब१ या आद्याक्षराने दर्शविल्याप्रमाणे २० फुट रूंदीचा रस्ता आखणेस मान्यता देण्यात येत आहे.

असा मनपा ठराव क्र.२२०, दिनांक२४/८/२००० चा ठराव मान्य झाला असून सदर ठरावाचा फेरविचार करुन खालीलप्रमाणे ठराव मान्य करण्यात यावा.

संदर्भ :- १) मा.शिवाजी केदारी व मा.सुधीर जानजोत यांचे दि.१४.१२.९३ चे पत्र

२) मा.शिवाजी केदारी व मा.अभय छाजेड यांचे दि.१४.६.९४ चे पत्र.

३) मा.सौ.भावना केदारी व मा.रामदास पवार यांचे दि.१७.६.९७ चे पत्र.

४) शहर सुधारणा समिती ठ.क्र.(१)११४०,दि.१६.१२.९३(२) १३१,दि.२३.६.९४ (३) ९३,दि.१९.६.९७

५) मा.अति.महा.आयुक्त (वि) यांनी पत्र क्र.मआ–नअ–वियो–२४८,दि.२५.५.२०००ने पाठविलेला अभिप्राय

६) शहर सुधारणा समिती ठराव क्र.२२२,दि.१४.७.२०००

७) मनपा ठराव क्र.२०७ दि.२१/१२/२०२०

८) मनपा ठराव क्र.१८७,दि. २१/९/२०२१

----

वानवडी स.नं.६२, हि.नं.७–८ मधून मा.महा.आयुक्त यांच्या पत्रासोबतच्या नकाशात अ–ब–ब१ या आद्याक्षराने दर्शविल्याप्रमाणे २० फुट रूंदीचा रस्ता आखावा असे दर्शविलेले आहे. परंतु ‘अ‘ आद्याक्षराने दर्शविलेला रस्ता हा रद्द करण्यात यावा.कारण सदर ठिकाणी पर्यायी रस्ता उपलब्ध आहे. त्यामुळे मा.महा.आयुक्त यांच्या पत्रासोबतच्या नकाशात ‘ब–ब१‘ या आद्याक्षराने दर्शविलेला रस्ता २० फुट रूंदीचा आखण्यात यावा.

**(टिप – सदर विषयाचा विचार माहे एप्रिल २०२२ च्या कार्यपत्रिकेच्या वेळी करावा असा मनपा ठराव क्र.६६३, दि. २२/११/२०२१ चा झाला आहे.)**

**नगरसचिव**

**पुणे महानगरपालिका**